भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/२०१३-१४/५७
डीबीओडी.बीपी.बीसी.क्र.६/२१.०४.१७२/२०१३-१४ जुलै १, २०१३

अध्यक्ष आणि संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व शेड्युल्ड कमर्शियल बँका (आरआरबीज् सोडून)

महोदय,

**महापरिपत्रक - अबँकिंय वित्तसहाय्य कंपनी (एनबीएफसीज)ह्यांना बँकवित्तीय सहाय्य**

कृपया वरील विषयावरील आमचे महापरिपत्रक डीबीओडी.बीपी.बीसी.क्र. २७/२१.०४.१७२/२०१२-१३ दि. जुलै २, २०१२ चा संदर्भ घ्यावा. हे महापरिपत्रक जून ३०, २०१२ पर्यंतच्या सर्व सूचना समाविष्ट करून अद्ययावत करण्यात आले असून आरबीआयच्या (http://www.rbi.org.in) वेबसाईटवरही देण्यात आले आहे.

आपला,

चंदन सिन्हा
प्रधान मुख्य महाव्यवस्थापक

बँक आर्थिक व्यवहार विभाग आणि विकास विभाग, केंद्रीय कार्यालये, १२वा मजला, केंद्रीय **कार्यालय बिल्डिंग,**
**शहिद भगतसिंह मार्ग, मुंबई-४०० ००१ ई-मेल :** cgmicdbodco@rbi.org.in

## *अबँकीय वित्तीय कंपन्यांना (एनबीएफसी) बँकेच्या चित्तसहाय्यावरील महापरिपत्रक*

### उद्दिष्ट

*बँकाद्वारे एनबीएफसींना वित्तसहाय्य करण्याबाबतचे भारतीय रिझर्व बँकेचे विनियामक धोरण ठरविणे.*

### वर्गीकरण

*बँकिंग विनियामक ॲक्ट, १९४९, सेक्शन ३५ए च्या खाली वैधानिक मार्गदर्शन देण्यात आले आहे.*

### पूर्वीच्या मार्गदर्शक तत्वांच्या जागी ही तत्वे आली आहेत.

*अबँकीय वित्तीय कंपन्यांना (एनबीएफसी) बँकेच्या अर्थसहाय्यावरील महापरिपत्रक डीबीओडी.बीपी.बीसी.क्र. २७/२१.०४.१७२/२०१२-१३ दि. जुलै २, २०१२.*

### लागु होणे

*सर्व शेड्युल्ड कमर्शियल बँका (आरआरबीज् सोडून)*

### रचना


| | |
|---|---|
| १. प्रस्तावना | ३ |
| १.१ संज्ञा | ३ |
| १.२ पार्श्वभूमि | ३ |
| २. आरबीआयकडे पंजीकृत झालेल्या एनबीएफसींना बँकेचे वित्तसहाय्य | ४ |
| ३. पंजीकरण आवश्यक नसलेल्या एनबीएफसीजसाठी बँकेच्या वित्तसेवा | ४ |
| ४. अवशिष्ट अबँकीय कंपन्यांना(आरएनबीसी) बँकेद्वारा वित्तपुरवठा | ४ |
| ५. बँकेच्या पत सुविधेसाठी पात्र नसलेले उपक्रम | ५ |
| ६. फॅक्टरिंग कंपन्यांना बँकेचे वित्त सहाय्य | ६ |
| ७. एनबीएफसींना बँकांनी करावयाच्या वित्तसहाय्यवरील अन्य निर्बंध | ७ |
| ७.१ सेतू कर्जे/तात्पुरते वित्तसहाय्य | ७ |
| ७.२ एनबीएफसींना शेअर्सच्या तारणात्मक प्रतिभूती विरुध्द दिलेल्या अग्रीमराशी २०१३ | ७ |
| ७.३ एनबीएफसींमध्ये निधी ठेवण्यासाठीच्या हमींवरील निर्बंध | ८ |
| ८. बँकांना एनबीएफसीबाबत असलेल्या जोखमींवरील प्रुडेंशियल मर्यादा | ८ |
| ९. एनबीएफसींनी दिलेल्या प्रतिभूती/संलेख मध्ये बँकांनी केलेल्या गुंतवणुकीबाबतचे निर्बंध | ९ |

*१. प्रस्तावना*

*भारतीय रिझर्व बँक अधिनियम १९३४ च्या प्रकरण ३(ब) च्या तरतुदींखाली, रिझर्व बँक, अबँकीय वित्तीय कंपन्यांच्या वित्तीय कार्यकृतींचे विनियम करत आली आहे.*

*भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ मध्ये जानेवारी १९९७ सुधारित केलेल्या ह्या अधिनियमाच्या कलम ४५ आयए अनुसार केलेल्या सुधारणेनुसार सर्व अबँकीय वित्तीय कंपन्या, रिझर्व बँकेकडे अनिवार्यतेने पंजीकृत झाल्या असणे आवश्यक आहे.*

*१.१ संज्ञा*

*(ए)'एनबीएफसी' म्हणजे, भारतीय रिझर्व बँकेच्या, अबँकीय पर्यवेक्षण विभागाकडे पंजीकृत झालेल्या अबँकीय वित्तीय कंपन्या*

*(ब) अवशिष्ट अबँकीय वित्तीय कंपन्या (आरएनबीसी) म्हणजे, भारतीय रिझर्व बँकेच्या, अबँकीय पर्यवेक्षण विभागाकडे वर्गीकृत व पंजीकृत झालेल्या अबँकीय वित्तीय कंपन्या*

*(क) 'चालु गुंतवणुकी' म्हणजे, कर्जदाराच्या ताळेबंदामध्ये 'चालु ॲसेट्स' म्हणून वर्गीकृत केलेल्या व एक वर्षापेक्षा कमी कालावधी धारण केलेल्या गुंतवणुकी*

*(ड) 'दीर्घ मुदतीच्या गुंतवणुकी' म्हणजे, 'चालु ॲसेट्स' म्हणून वर्गीकृत केलेल्या सोडून इतर सर्व गुंतवणुकी*

*(ई) 'अप्रतिभूतित कर्जे' म्हणजे, कोणत्याही मूर्त ॲसेटने प्रतिभूतित न केलेली कर्जे*

*१.२ पार्श्वभूमी*

*बँकांच्या कर्ज संबंधित बाबी, रिझर्व बँकेद्वारा, सतत विनियम - मुक्त करण्यात आल्या आहेत. बँकांना, कर्ज वाटपाबाबत अधिकतर कार्यकारी स्वातंत्र्य देण्याच्या धोरणाला धरुन आणि एनबीएफसींचे रिझर्व बँकेकडे अनिवार्य पंजीकरण करण्याच्या संदर्भित, बँकांद्वारे एनबीएफसींना वित्तसहाय्य करण्यासंबंधीच्या बहुतेक बाबी, विनियममुक्त करण्यात आल्या आहेत. तथापि, एनबीएफसींद्वारे अर्थसहाय्य केल्या जाणाऱ्या काही विशिष्ट कार्यकृतींना असलेल्या संवेदनशीलतांचा विचार करता, अशा कार्यकृतींना अर्थसहाय्य करण्याबाबतचे निर्बंध सुरुच आहेत.*

*२. आरबीआयकडे पंजीकृत असलेल्या एनबीएफसीना बँकेचे अर्थसहाय्य*

*२.१ बँक क्रेडिटवरील मर्यादा एनबीएफसीजच्या मालकीच्या निव्वळ निधीशी (एनओएफ) निगडीत असून ती आरबीआयकडे बंधनकारक प्रकारे पंजीकृत नसलेल्या आणि सुविधांसाठी वित्तपुरवठा, कर्ज, उद्योग आणि गुंतवणूकीचे व्यवहार करणा-या सर्व एनबीएफसीजमधून काढून टाकण्यात आली आहे. त्यानुसार, आरबीआयकडे*

पंजीकृत असलेल्या आणि मूलभूत सुविधा (इन्फ्रास्ट्रक्चर वित्तपुरवठा, उपकरण भाड्याने देण्याची सुविधा, भाड्याने घेणे- विकत घेणे सुविधा, कर्ज, उद्योग आणि गुंतवणूकीशी संबंधित उपक्रमांमध्ये असलेल्या सर्व एनबीएफसीजना बँका गरजेवर आधारित कार्य- भांडवल सुविधा आणि दीर्घकालीन कर्ज देऊ शकतात.

२.२ द्वितीय स्तरावरील साधनांना वित्तसेवा देण्यामध्ये एनबीएफसीला प्राप्त असलेल्या अनुभवाच्या संदर्भात त्यांनी वित्तपुरवठा केलेल्या सेकंड हॅंड ॲसेटस विरुध्द बँका एनबीएफसीला वित्तसेवा प्रदान करू शकतात.

२.३. त्यांच्या संचालक मंडळांच्या मान्यतेसह बँका कर्ज देण्यासाठीची योग्य धोरणे रिझर्व बँकेने निर्देशित केलेल्या महत्त्वपूर्ण मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणि विहित निर्देशांनुसार निश्चित करू शकतात व

परिच्छेद ५ व ६ मध्ये नमूद केलेले उपक्रमांना जर एनबीएफसीजद्वारे वित्तसेवा प्रदान केली जात नसेल; तर त्यांना वर उल्लेख केल्याप्रमाणे बँका विविध प्रकारच्या पत सुविधा देऊ शकतात.

## ३. पंजीकरण आवश्यक नसलेल्या एनबीएफसीजसाठी बँकेच्या वित्तसेवा [१]

आरबीआयकडे नोंदणी करण्याची आवश्यकता नसलेल्या संस्थांच्या बाबतीत, म्हणजे (१) विमा अधिनियम १९३८ च्या कलम ३ खाली नोंदणीकृत विमा कंपन्या (२) कंपन्या अधिनियम १९५६ च्या कलम ६२० अ खाली अधिसूचित केलेल्या निधी कंपन्या (३) भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ च्या, कलम ४५-आय (बीबी) च्या खंड (७) च्या स्पष्टीकरणानुसार, चिट फंडाचाच मुख्य व्यवसाय करणा-या चिट फंड कंपन्या (४) सिक्युरिटी अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया अधिनियमाच्या कलम १२ खाली नोंदणी झालेल्या स्टॉक ब्रोकिंग कंपन्या/मर्चंट बँकिंग कंपन्या आणि (५) नॅशनल हाऊसिंग बँक (एन एच बी) द्वारा नोंदणी केलेल्या गृह वित्त कंपन्या (आरबीआयकडे नोंदणी करण्यापासून सूट मिळालेल्या), त्या बँका, कर्जाचा उद्देश, त्या मालमत्तेचे स्वरुप व दर्जा, कर्जदाराची परतफेडीची क्षमता व दिसणारी जोखीम इत्यादि नेहमीच्या घटकांवर आधारित त्यांचे कर्जविषयक निर्णय घेऊ शकतात.

## ४. अवशिष्ट अबँकीय कंपन्यांना(आरएनबीसी) बँकेद्वारा वित्तपुरवठा

४.१ अवशिष्ट अबँकीय कंपन्यांना(आरएनबीसी) बँकेद्वारा वित्तपुरवठा ही, रिझर्व बँकेकडे पंजीकरण करणे अपरिहार्यतेने आवश्यक आहे. आरबीआयकडे पंजीकृत झालेल्या अशा कंपन्यांच्या बाबतीत, त्यांना बँकेद्वारे दिले जाणारे अर्थसहाय्य, त्यांच्या निजनिधी (एनओएफ) पुरतेच निर्बंधित असेल. डिलिट

### ४.२ निज निधी (एनओएफ)

४.२.१. भारतीय रिझर्व बँक अधिनियम १९३४ च्या कलम ४५ आयएला दिलेली निजनिधीची व्याख्या बँकांनी अनुसरावी. म्हणजेच,

*[1]आरबीआयकडे नोंदणी करण्याची आवश्यकता नसलेल्या एनबीएफसींना अर्थसहाय्य करताना, बँकांनी, भारत सरकारच्या कॉर्पोरेट अफेअर्स मंत्रालयाने ह्याबाबत वेळोवेळी दिलेली मार्गदर्शक तत्वे/अधिसूचनांचा संदर्भ घ्यावा*

***१. निजनिधी म्हणजे,***

*(ए) त्या कंपनीच्या अगदी अलिकडील ताळेबंदात दर्शविलेल्या भरणा झालेले इक्विटी भांडवल व मुक्त राखीव निधी व त्यातून वजा,*

(i) *संचयित शिल्लक तोटा*

(ii) *डिफर्ड रेव्हेन्यु खर्च आणि*

(iii) *इतर अमूर्त ॲसेट्स , आणि*

*(ब) ह्यातून पुढे वजा*

(१) *खालील प्रकारे शेअर्समध्ये गुंतवणुक केलेली कंपनी*

(i) *तिच्या दुय्यम कंपन्या*

(ii) *त्यांच गटातील कंपन्या*

(iii) *इतर सर्व अबँकिंय एनबीएफसीं ;आणि*

*(२) डिबेंचर्स, बॉंड्स, येणे असलेली कर्जे व दिलेल्या अग्रिमराशी (हायर परचेस व लीज फायनानस धरुन) ह्यांचे पुस्तकीमूल्य व*

(i) *तिच्या दुय्यम कंपन्या आणि*

(ii) *त्याच गटातील कंपन्यांमधील, अशा कंपनीमधील आणि ठेवी-मात्र अशी रक्कम वरील (अ) च्यादहा टक्क्यांपेक्षा अधिक असावी.*

**२.** *'सहाय्यकारी बँक' आणि 'एकाच गटातील कंपन्या' ह्यांचे अर्थ कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) ह्यामध्ये दिलेल्या अर्थाप्रमाणेच राहतील.*

***५. बँकेच्या पत सुविधेसाठी पात्र नसलेले उपक्रम***

***५.१*** *एनबीएफसीजद्वारे करण्यात येणारे पुढील उपक्रम बँकेच्या पत सुविधेसाठी पात्र नसतील.*

(i) *पुढील प्रकारच्या विक्रीबाबत एनबीएफसींनी डिस्काउंट केलेल्या बिलांचे रि-डिस्काउंटिंग सोड्ल्यास डिस्काऊंट/रिडिस्काऊंट केलेली बिले.*

*(अ) (हलक्या व्यावसायिक वाहनांसह) व्यावसायिक वाहने आणि*

(ब) दुचाकी आणि तीन चाकी वाहने पुढील अटींसह

अटीः

* उत्पादकांद्वारे खर्च (बिल) फक्त विक्रेत्यांच्याच नावाने काढले गेले पाहिजेत;

* चॅसिस /इंजिन क्रमांक ह्यामधून निश्चित होणा-या खर्चाच्या ख-या व्यवहारानुसारच खर्च/ बिल बनवले गेले पाहिजेत; आणि

* बिलांचे रिडिसकाऊंटिंग करण्यापूर्वी, बँकांनी, ती बिले रिडिस्काऊंटिंग करणा-या एनबीएफसीचा खरेपणा व पूर्व कामगिरी ह्याबाबत स्वतः चे समाधान करून घ्यावे.

(ii) एनबीएफसीजची वर्तमान आणि दीर्घकालीन अशी कोणतीही गुंतवणूक समभाग, ऋणपत्र इत्यादि प्रकारे कंपनी/ संस्था असे असले तरीही स्टॉक ब्रोकिंग करणा-या कंपन्यांना त्यांचे समभाग आणि त्यांच्या व्यापारातील स्टॉकवरील ऋणपत्रानुसार गरजेवर आधारित पत सुविधा देण्यात येऊ शकेल.

(iii) असुरक्षित कर्ज/एनबीएफसीजद्वारे अन्य कोणत्याही कंपन्यांमध्ये केली जाणारी आंतर- कॉर्पोरेट ठेवी (इंटर कॉर्पोरेट डिपॉझिट).

(iv) एनबीएफसीजद्वारे त्यांच्या सहाय्यक आणि गटातील कंपन्यांना/ संस्थांना देण्यात येणारी सर्व प्रकारचे कर्जे आणि अग्रिम राशी.

(v) एनबीएफसीजना आरंभिक सार्वजनिक सेवेसह (आयपीओ) जोडण्याकरता व्यक्तींना उधारीने देण्यासाठी आणि दुस-या स्तरावरील बाजारपेठेमधून समभाग खरेदी करण्यासाठी वित्तसेवा.

### ५.२ लीज्ड व सबलीज्ड ॲसेट्स

साधनसामग्री भाडेपट्टयाने देणाऱ्या कंपन्यांना बँका वित्तसहाय्य करु शकत असल्याने, साधनसामग्री भाडेपट्टयाने देणाऱ्या अशा कंपन्यांना तसेच इतर अबँकीय वित्तीय कंपन्यांबरोबर बँकांनी विभागीय भाडेपट्टा करार करु नये.

### ६. फॅक्टरिंग कंपन्यांना बँकेचे वित्त सहाय्य

(६.१) फॅक्टरिंग रेग्युलेशन अधिनियम, २०११ नुसार (हा अधिनियम फॅक्टरिंग कंपन्यांचे नियंत्रण करतो आणि इतर बाबींसह, फॅक्टर, फॅक्टरिंग व्यवसाय, प्रधान व्यवसाय, असाईनमेंट इत्यादींची व्याव्याही देतो) रिझर्व बँकेला, ॲसेट्स व एकूण उत्पन्नाबाबतच्या प्रधान व्यवसायाच्या अटी ठरविण्याचे तसेच फॅक्टर्सकडून माहिती घेण्याचे व त्यांना निदेश देण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

(६.२) त्यानुसार रिझर्व बँकेने एक नवीन प्रकारचा वर्ग सुरु केला (म्हणजे अबँकीय वित्तीय कंपनी फॅक्टर्स) आणि तिने ह्याबाबत एक अधिसूचना डीएनबीएस.पीडी.क्र.२४७/सीजीएम (युएस) २०१२ दि. जुलै ३, २०१२ जारी केली. वरील अधिसूचनेच्या परिच्छेद ६(१) मध्ये अशा एनबीएफसीचा प्रधान व्यवसाय विहित केला असून, त्यात सांगण्यात आले आहे

*की एनबीएफसी  फॅक्टरने खात्री करुन घ्यावी की, फॅक्टरिंग व्यवसायामधील तिचे वित्तीय ॲसेट्स हे तिच्या एकूण ॲसेट्सच्या किमान ७५% आहेत आणि तिचे फॅक्टरिंग व्यवसायातून मिळालेले उत्पन्न तिच्या एकूण उत्पन्नाच्या ७५% पेक्षा कमी असणार नाही.*

*(६.३) वरील बाबींचा विचार करता, बँकेच्या अर्थसहायासाठी पात्र असलेल्या फॅक्टरिंग कंपन्यांच्या ॲसेट व उत्पन्नाबाबतच्या निकषांचे पुनरावलोकन करण्यात आले आहे.  त्यानुसार,  वरील परिच्छेद ५.१ (१)  व ५.१ (४) मध्ये निर्देशित केलेल्या निर्बंधांचा विचार न अकरताही, बँका, पुढील निकष पूर्ण करणाऱ्या फॅक्टरिंग कंपन्यांच्या फॅक्टरिंग व्यवसायाला वित्तसहाय्य करु शकतात :*

*(अ) ह्या कंपन्या फॅक्टरिंग कंपन्या म्हणून पात्र आहेत आणि त्या त्यांचा व्यवसाय, फॅक्टरिंग रेग्युलेशन अधिनियम, २०११ च्या आणि रिझर्व बँकेने वेळोवेळी ह्याबाबत दिलेल्या अधिसूचनांच्या तरतुदींनुसार करत आहेत.*

*(ब) त्या त्यांच्या उत्पन्नाच्या ७५% भाग फॅक्टरिंगच्या कार्यकृतींमधूनच मिळवत आहेत.*

*(क) विकत घेतलेले/वित्तसहाय्य केलेले रिसीव्हेबल्स, मग ते 'रिकोर्ससह' असोत किंवा 'रिकोर्सविरहित' असोत, त्या फॅक्टरिंग कंपनीच्या ॲसेट्सच्या किमान ७५ टक्के असावेत.*

*(ड) वर संदर्भित केलेल्या ॲसेट्स/उत्पन्नात, त्या फॅक्टरिंग कंपनीने देऊ केलेल्या कोणत्याही बिल डिस्काउंटिंग सुविधेसंबंधीच्या ॲसेट्स/उत्पन्नाचा समावेश नसावा.*

*(ई) त्या फॅक्टरिंग कंपनीने देऊ केलेले वित्तीय सहाय्य, त्यांच्या लाभार्थ अशा रिसीवेबल्सच्या गहाणवटीने किंवा असाइनमेंटने प्रतिभूतित केलेले असावे.*

### ***७. एनबीएफसींना बँकांनी करावयाच्या वित्तसहाय्यवरील अन्य निर्बंध***

#### ***७.१ सेतू कर्जे/तात्पुरते वित्तसहाय्य***

*भांडवली/डिबेंचर इश्युज्विरुध्द कोणत्याही स्वरुपाची सेतु कर्जे किंवा तात्पुरते अर्थसहाय्य आणि/किंवा, भांडवल, ठेवी इत्यादी मार्गांची मार्केटमधून दीर्घ मुदतीची कर्जे काढण्याबाबत, भरुन काढण्याच्या स्वरुपाची कर्जे बँकांनी अबँकीय वित्तीय कंपन्या तसेच अवशिष्ट बँकीय कंपन्यांच्या (आरएनबीसी) सर्व प्रकारांना देऊ नयेत.*

*बँकांनी कठोरपणे ह्या सूचनांचे पालन करावे आणि असुरक्षित तडजोड करण्यात येणा-या सूचना, बदलत्या व्याज दराचे रोखे भिन्न प्रकारे कर्जाला मिळणा-या मान्यतेसह जाणीवपूर्वक किंवा खोट्या दाव्याद्वारे ह्या नियमांचे उल्लंघन केले जाणार नाही, ह्याची खात्री करावी; तसेच ज्यांची परतफेड अनुदानातून देण्याचे प्रस्तावित आहे/ अपेक्षित आहे किंवा बाह्य/ अन्य साधनांसाठी वळवण्यात येण्याची शक्यता असलेल्या आणि साधनांच्या वापरामुळे प्राप्त झालेल्या निव्वळ नफ्याव्यतिरिक्त नसलेल्या अशा अल्पकालीन कर्जांच्या संदर्भातही हे लागू आहे.*

#### ***७.२ एनबीएफसींना  शेअर्सच्या तारणात्मक प्रतिभूतीविरुध्द दिलेल्या अग्रीमराशी***

*एनबीएफसींच्या कोणत्याही कर्जदारांना, प्रतिभूतित कर्जांसाठी, कोणत्याही हेतूने, तारण म्हणुन शेअर्स*

व डिबेंचर्स, स्वीकारता येणार नाहीत.

**७.३ एनबीएफसींमध्ये निधी ठेवण्यासाठीच्या हमींवरील निर्बंध**

आंतर-कंपनी डिपॉझिटस/ कर्जे ह्यांसह एनबीएफसीज/ अन्य संस्थांनी स्वीकारलेल्या जमा रकमेच्या/ कर्जाच्या हमीसाठी बँकांनी हमी देऊ नये. ह्या बंधनामध्ये कोणताही स्रोत असलेल्या सर्व जमा रकमा/ कर्जांचा समावेश करण्यात येईल व त्यामध्ये विश्वस्त न्यास (ट्रस्ट) आणि अन्य संस्थांपासून एनबीएफसीजना मिळालेल्या रकमा/ कर्जाचा समावेश केला जाईल. एनबीएफसीजसह असलेल्या जमा रकमेला ठेवण्याच्या अप्रत्यक्ष उद्देशासाठी हमी देण्यात येऊ नये.

**८. एनबीएफसींबाबत बँकांच्या जोखमीसाठी प्रुडेंशियल मर्यादा**

८.१ (ताळेबंदाच्या पलीकडील खर्चासह उधार देण्याच्या व गुंतवणूकीच्या संदर्भात) बँकेतर्फे एका एनबीएफसी/ एनबीएफसी- एएफसी (साधन) साठी देण्यात येणारी राशी, ही शेवटच्या लेखापरीक्षण केलेल्या ताळेबंदानुसार असलेल्या बँकेच्या भांडवलाच्या (आर्थिक कंपन्या) अनुक्रमे १०% ते १५% पेक्षा अधिक असू नये. तरीसुद्धा, जर एनबीएफसी/ एनबीएफसी- एएफसी ह्यांनी पायाभूत क्षेत्रामध्ये घेतलेल्या अनुदानाच्या अनुक्रमे १०% ते १५% पेक्षा जास्त जोखीम असेल तर एका एनबीएफसी/ एनबीएफसी- एएफसीवर बँका त्यांच्या भांडवलाच्या १५% ते २०% अनुक्रमे इतका खर्च करू शकतात. तसेच, वरील खर्च बँकांनी, एनबीएफसी-आयएफसींना (इन्फ्रास्ट्रक्चर फायनान्सकंपन्या) दिलेले वित्तसहाय्य, तिच्या शेवटच्या ऑडिटेड ताळेबंदानुसार असलेल्या भांडवलाच्या १५% पेक्षा अधिक नसावे व त्यातही तरतुद असावी की ते २०% पर्यंत वाढविण्याची तरतुद ही, त्या आयएफसीने इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्राला नंतर कर्जाऊ दिल्यामुळे असावी.

८.२ सर्व एनबीएफसी मिळून येणाऱ्या एकूण जोखमीसाठी बँका एक अंतर्गत मर्यादा ठरवू शकतात.

८.३ सुवर्ण अलंकारांच्या तारणाविरुध्द मुख्यत्वेकरुन कर्ज देणा-या केवळ एकाच एनबीएफसी बाबतचे एखाद्या बँकेचे एक्सपोझर (कर्ज देणे, गुंतवणुक, ताळेबंदाबाहेरील एक्सपोझर्स धरुन) त्या बँकेच्या भांडवली निधिच्या ७.५ टक्क्यांपेक्षा अधिक नसावे. तथापि हे एक्सपोझर ५ टक्के अधिक म्हणजे त्या बँकेच्या भांडवली निधिच्या १२.५ टक्क्यांपर्यंत जाऊ शकते - मात्र असे अतिरिक्त एक्सपोझर हे, अशा एनबीएफसींनी पायाभूत सोयी क्षेत्राला दिलेल्या कर्जाऊ निधीमुळे निर्माण झालेले असावे. अशा एनबीएफसींच्या बाबतीत असलेले एक्सपोझर, मे १८, २०१२ रोजी, वरील विनियामक मर्यादेपेक्षा अधिक असणा-या बँकांनी, ते एक्सपोझर, नोव्हेंबर १७, २०१२ च्या आत विहित मर्यादेत आणणे आवश्यक आहे.

८.४ एकूण वित्तीय ॲसेट्सच्या ५० टक्के किंवा अधिक एवढी सुवर्ण कर्जे असणा-या सर्व एनबीएफसीं बाबतच्या एकूण एक्सपोझर्सवर बँकांनी एखादी अंतर्गत उप-मर्यादा ठेवावी. ही उप मर्यादा, वरील परिच्छेद ८.२ मध्ये विहित केल्यानुसार, बँकांच्या, सर्व एनबीएफसींसाठी असलेल्या एक्सपोझर्ससाठी त्यांनी ठरविलेल्या अंतर्गत मर्यादेच्या आत असावी.

८.५ एक्सपोझरची मर्यादा काढण्यासाठी, ताळेबंदाच्या प्रसिध्दीच्या तारखेनंतरही भांडवली निधीचे इनफ्युजन हिशेबात घेतले जाऊ शकते. असे भांडवल वाढविल्यानंतर, बँकांनी, बाह्य ऑडिटर्सकडून त्याबाबतचे प्रमाणपत्र घेऊन, ते भांडवली निधीत भर घालण्यापूर्वी भारतीय रिझर्व बँकेकडे (बँकिंग पर्यवेक्षण विभाग) सादर करावे.

***९. एनबीएफसींनी दिलेल्या प्रतिभूती/संलेख मध्ये बँकांनी केलेल्या गुंतवणुकीबाबतचे निर्बंध***

**९.१** *प्रचालक एनबीएफसीने सर्व उपवर्जित व्याजांसाठी सिंकिंग फंड निर्माण करुन तो लिक्विड गुंतवणुकी/सिक्युरिटीजमध्ये (सरकारी बाँड्स) गुंतविल्या शिवाय, बँकांनी, एनबीएफसींनी दिलेल्या झीरो कुपन बाँड्समध्ये (झेडसीबी) गुंतवणुक करु नये. एनबीएफसींच्या अपरिवर्तनीय डिबेंचर्समध्ये (एनसीडी), मूल किंवा सुरुवातीच्या एक वर्षाच्या परिपक्वतेसह, गुंतवणुक करण्यास परवानगी आहे.*

**९.२** *एनबीएफसींनी दिलेल्या मूळ किंवा सुरुवातीच्या एक वर्षाच्या परिपक्वता काळासाठी अपरिवर्तनीय डिबेंचर्स (एनसीडी) मध्ये गुंतवणुक करण्यास बँकांना परवानगी आहे. तथापि, अशा संलेखांमध्ये गुंतवणुक करताना, बँकांनी जारी असलेल्या विद्यमान प्रुडेंशियल मार्गदर्शक तत्वांचे मार्गदर्शन घ्यावे तसेच, प्रचालकाने, डिसक्लोजर डॉक्युमेंटमध्ये ते एनसीडी देण्यामागील उद्देश प्रकट केला असल्याची तसेच मागील परिच्छेदांमध्ये दिलेल्या सूचनांना धरुनच असे उद्देश बँकेच्या अर्थसहाय्यासाठी पात्र असल्याची खात्री करुन घ्यावी.*

## महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या परिपत्रकांची यादी

| | परिपत्रक क्र. | दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| १ | डीबीओडी.क्र.एफएससी.बीसी.७१/सी. ४६९/९१ | २२.०१.९२ | काही विशिष्ट क्षेत्रांना द्यावयाच्या कर्जावरील निर्बंध |
| २ | आयईसीडी.क्र.१४/०८.१२.०१/९४ | २८.०९.९४ | अबँकीय वित्तीय कंपन्यांना कर्ज देणे |
| ३ | आयईसीडी.क्र.४२/०८.१२.०१/९४ | २१.०४.९५ | अबँकीय वित्तीय कंपन्यांना कर्ज देणे |
| ४ | डीबीओडी.क्र.एफएससी.बीसी.१०१/२४.०१.००१/९५ | २०.०९.९५ | इक्विपमेंट लीजिंग, हायर परचेस व फॅक्टरींग इत्यादि कार्यकृती |
| ५ | आयईसीडी.क्र.१४/०८.१२.०१/९४ | ०६.१२.९६ | विद्यमान ॲसेट्सच्या खरेदी/लीज साठी बँकेचे अर्थसहाय्य |
| ६ | आयईसीडी.क्र.१५/०८.१२.०१/९७ | ०४.११.९७ | बँकांद्वारे कर्ज देण्यावरील मार्गदर्शक तत्वे कार्यकारी भांडवलाचे मूल्यामापन |
| ७ | आयईसीडी.क.२९/०८.१२.०१/९८ | २५.०५.९९ | अबँकीय वित्तीय कंपन्यांना कर्ज देणे |
| ८ | आरबीआय/२७३/२००४-०५डीबीओडी.आय ईसीएस.क्र. ६०/०८.१२.०१(एन)/२००७-०८ | १९.११.०४ | २००४-०५ वर्षासाठीच्या वार्षिक धोरण निवेदनाचे मुदतमध्य पुनरावलोकन एनबीएफसींना बँकेचे वित्तसहाय्य |
| ९ | आरबीआय/२००७-०८/२३५ डीबीओडी.बीपी.बीसी.क्र. ६०/०८. १२.०१/२००७-०८ | १२.०२.०८ | फॅक्टरिंग कंपन्यांना बँकेचे अर्थसहाय्य |
| १० | आरबीआय/२००९-१०/३१७ डीबीओडी.बीपी.बीसी.क्र.७४/२१.०४.१७२/२००९-१० | १२.०२.१० | इन्फ्रास्ट्रक्चर फायनान्स म्हणून वर्गीकृअत केलेल्या एनबीएफसींबाबत बँकेच्या एक्सपोझरबाबत रिस्क वेट्स व एक्सपोझर नॉर्म्स |
| ११ | आरबीआय/२०१०-११/२१९ डीबीओडी.बीपी.बीसी.क्र.४४/२१.०४.१४१/२०१ | २९.०९.१० | झीरो कुपन बाँड्समधील गुंतवणुकीवरील प्रुडेंशियल नॉर्म्स |
| १२ | आरबीआय/२०१०-११/३४९ डीबीओडी.बीपी.बीसी.क्र.७२/२१.०४.१४१/२०१०-११ | ३१.१२.१० | नॉन-एसएलआर सिक्युरिटीजमधील गुंतवणुक एक वर्षापर्यंतच्या परिपक्वतेचे अपरिवर्तनीय कर्ज रोखे (एनसीडी) |
| १३ | डीबीओडी.क्र.डीआयआर.बीसी.९०/१३.०७.०५/९८ | २८.०८.९८ | शेअर्स व डिबेंचर्स विरुध्द बँकेचे अर्थसहाय्य |
| १४ | डीबीओडी.क्र.डीआयआर.बीसी.१०७/१३.०७.०५/९८-९९ | ११.११.९८ | बँकांद्वारे बिलांचे रिडिसकाऊंटिंग |
| १५ | डीबीओडी.क्र.डीआयआर.बीसी.१७३/१३.०७.०५/९९-२००० | १२.०५.२००० | बँकांद्वारे बिलांचे रिडिसकाऊंटिंग |
| १६ | डीबीओडी.क्र.डीआयआर.बीसी.५१/२१.०४.१३७/२०००-०१ | १०.११.२००० | इक्विटीजचे बँकेद्वारा अर्थसहाय्य व शेअर्स मधील गुतवणुक |
| १७ | आरबीआय/२००४-०५/६८ डीबीओडी.क्र.डीआयआर.बीसी.१८/१३.०३.००/२००४-०५ | २३.०७.२००४ | एनबीएफसीमध्ये निधी ठेवण्यावरील निर्बंध |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | आरबीआय/२००६-०७/२०५<br>डीबीओडी.क्र.एफएसडी.बीसी.४६/२४.० १.०२८/२००६-०७ | १२.१२.२००६ | सिस्टमॅटिकली इंपॉर्टटं एनबीएफसी व बँकेचा त्यांच्या बरोबरील संबंध - अंतिम मार्गदर्शक तत्वे |
| १९ | आरबीआय/२०११-१२/५६८<br>डीबीओडी.बीपी.बीसी.क्र.१०६/२१.०४.१७२/२०११-१२ | १८.०५.२०१२ | सुवर्णाविरुध्द मुख्यत्वेकरुन कर्ज देणा-या एनबीएफसींना बँकेकडून अर्थसहाय्य. |
| २० | आरबीआय/२०१२-१३/१९९<br>डीबीओडी.बीपी.बीसी.क्र.४०/२१.०४.१७२/२०१२-१३ | ११.०९.२०१२ | फॅक्टरिंग कंपन्यांना बँकेचे वित्तसहाय्य |